# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला (दक्षिण कक्ष), बेलापुर, नवी मुंबई- ४००६१४.
दुरध्वनी : ०२२ - २७५७०१६६/२७५७१६७३/२७५७०९६९


---

जा.क्र.मजीप्रा-२०१९/प्र.क्र.१४/आ-६ दिनांक :- १५/६/२०१९.

**प्रति,**
मुख्य अभियंता,
म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग,
**ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.**

**विषय** :- सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील जलस्वराज्य-२ व पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेकरिता कनिष्ठ अभियंता यांच्या सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देणेबाबत.

**संदर्भ** :- कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांचेकडील दिनांक १४/१/२०१९.

उपरोक्त विषयी, संदर्भित दिनांक १४/१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांनी श्री.ए.ए.साळवी, शाखा अभियंता (स्थापत्य) यांच्या जागी उमेदवाराची नियुक्ती म.जी.प्रा.कडून देणेबाबत, मध्यवर्ती कार्यालयास कळविले आहे.

२. महाराष्ट्र शासन, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांचेकडील अभियंत्यांचे पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहे. सदर बाब आपले प्रादेशिक विभागातील कनिष्ठ/शाखा अभियंता (स्था.) यांचे निदर्शनास आणावी. आपल्या तसेच आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त कार्यालयातील कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (स्थापत्य) हे उक्त कार्यालयात २ वर्षाकरिता प्रतिनियुक्तीने जाण्यास इच्छूक असल्यास त्यांचे अर्ज खालील तपशीलासह आपल्या शिफारशीस मध्यवर्ती कार्यालयास दिनांक २१/६/२०१९ पर्यंत पाठविण्यात यावेत.

१. इच्छूक अभियंता ज्या कार्यालयात कार्यरत आहेत. त्या कार्यालयातील मंजूर, भरलेली व रिक्त पदांचा तपशील.
२. इच्छूक अभियंता ज्या कार्यालयात कार्यरत आहेत. त्या कार्यालयातील एकुण कार्यभाराचा तपशील.
३. इच्छूक अभियंता यांचा मागील १० वर्षाचा सेवेचा कालावधीचा तपशील.
४. इच्छूक अभियंता यांना प्रतिनियुक्तीने नेमणूक दिल्यास त्यांना प्रतिनियुक्तीच्या कार्यालयात रुजू होणेकरिता कार्यमुक्त करता येईल किंवा कसे, याबाबत संबंधितांचे कार्यालय प्रमुखाचे व आपले अभिप्राय.
५. इच्छूक अभियंत्याविरुध्द विभागीय चौकशी किंवा फौजदारी कार्यवाही सुरु अथवा प्रस्तावित आहे काय?

..२/-

३.	शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही २०१६/प्र.क्र.५१०/कार्यासन १२, दिनांक १६/२/२०१८ मधील (ज) मध्ये नमुद केल्यानुसार प्रतिनियुक्तीवरुन मूळ प्रशासकीय विभागात/कार्यालयात सेवा प्रत्यावर्तित झाल्यावर मूळ विभागात मूळ संवर्गात किमान ३ वर्षे कालावधी पूर्ण केलेला आहे, त्याच अभियंत्यांचे अर्ज मध्यवर्ती कार्यालयास पाठविण्यात यावेत.

**(अशोक मांडे)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र)**

प्रत : अधीक्षक अभियंता, मुख्यालय, एक्सेप्रस टॉवर्स, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत : अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. म.नि.सं.सं. कक्ष, सिडको भवन, बेलापूर नवी मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.